**Gomantak, Sunday 25 August 2019**

गोमन्तक

# दाभाळ येथे कृषिदुतांकडून माती परीक्षणाबाबत जागृती

**रिवण,** ता. २४ (वार्ताहर): माती परीक्षण करणे काळाची गरज आहे. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमीनीचा पोत खालावत चाललेला आहे. जमिनीतील सुक्ष्मजीवांचे जीवतचक्र बिघडत आहे. त्यामुळे माती परीक्षण करूनच जमिनिला व पिकाला आवश्यक असणाऱ्या खतांचा वापर करणे आवश्यक आहे.

दाभाळ, धारबांदोडा येथे राहण्यासाठी आलेले डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूत यांनी दाभाळ येथील बाबूश गावकर बागेत माती गोठन करण्याची प्रात्यक्षिक करून दाखविले.



दाबाळ : जनजागृती करताना डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत.

माती परीक्षण म्हणजे काय ? शास्त्रीय पध्दतीने शेतातील किंवा बागामधील माती गोळा करून प्रयोग शाळेत तिच्यातील विविध घटकांची मात्रा पडताळणे होय. यामध्ये जमिनीचा सामू कर्बाची मात्रा, आवश्यक मुलद्रव्यांची मात्रा, आवश्यक मुलद्रव्यांची मात्रा (नत्र, स्फुरद व पालाश अर्थात एनपीके) पडताळली जाते. पिकांना आवश्यक तेवढ्या प्रमाणात खत पुरवठा या माती परीक्षणातून ठरवला जातो. या सगळ्याचा तपशील असेलली पोचपावती म्हणजे सॉयल हेल्थ कार्ड. गोव्यामध्ये माती परीक्षण कृषी विज्ञान केंद्रामध्ये केले जाते. प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनिची परीक्षण करणे गरजेचे आहे.

शेतातील माती १५-२० सेंमी खोलवर अंतरावर घ्यावी व बागेतील ४० - ५० सेंमी खोलवर गोळा करावी. पूर्ण शेतातील व बागामधील प्रत्येकी दहा ते बारा जागेवरून माती गोळा करून एकत्र करावी व त्यातील सुमारे दोन किलो माती फक्त सावळीत सुखवावी. माती पूर्णपणे सुखलेली माती कृषी केंद्रात परीक्षण करण्यासाठी द्यावी, असे त्या कृषीदुतांनी त्यावेळेस उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.

Goa, Main
25/08/2019 Page No. 15